|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990 'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/१४/विवि/साहसकार्य-२२/ १७ /२०२५ दि.१७/०१/२०२५

**प्रति,**

१) मा.प्राचार्य / मा. संचालक,
जळगाव जिल्हयातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था व

२) मा. संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना -

**विषय:-** जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळेसाठी विद्यार्थी/विद्यार्थिनी पाठविणेबाबत.....

**संदर्भ :-** विद्यापीठाचे पत्र क्र.जा.क्र.उमवि/14/विवि-47/182/2024, दि. 22/08/2024

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा, याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, त्यास सभोवतालचे वातावरण अवगत व्हावे, श्रमसंस्कृतीची जाण व्हावी, सांस्कृतिक कला जोपासली जावी असा प्रयत्न विभागाद्वारे केला जात आहे.

**शै. वर्ष २०२४ -२५ मधील जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळा दि. ३०, ३१ जानेवारी व ०१ फेब्रुवारी २०२५** या कालावधीत **विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग** व **म.गा.शि.म.चे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा. यांच्या सयुंक्त विद्यमाने कर्जाने, ता.चोपडा जि.जळगाव** येथे आयोजित केलेली आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **जळगाव जिल्हास्तरीय साहस** कार्यशाळेत विद्यार्थ्यांना समाजाप्रती भूमिका व निरनिराळया समस्यांमध्ये अथवा संकटकाळामध्ये निर्णय क्षमता वाढीला लागणे हे गरजेचे आहे. निसर्ग निर्मीतीमध्ये उदा. पूर, आग लागणे, भूकंप यासारख्या आणीबाणीच्या प्रसंगी धैर्याने कसे सामोरे जावे त्यातून मार्गदर्शन व इतरांना मदत करणे. जीवीत व वित्त हानीपासून संरक्षण करणे आवश्यक असते. सकारात्मक कर्तव्याची भावना वाढीस लागावी व साहसीवृत्ती व्हावी. त्यासाठी आपल्या महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा विभाग मधील खालील निकषानुसार **०६ विद्यार्थी (३ विद्यार्थी व ३ विद्यार्थिनी)** निवड करून पाठवावेत, ही विनंती.

* सदर विद्यार्थी गुणवत्ताधारक, आज्ञाधारक, कुशल, बोलका, तात्काळ निर्णय घेणारा, कला जोपासणारा व नेतृत्व गुण सांभाळणारा असावा.
* सदर विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात (सन २०२४-२०२५) नियमित शिक्षण घेणारा असावा. त्याच्या/तिच्याकडे अद्ययावत (प्राचार्य/संचालक यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.
* सदर विद्यार्थी-विद्यार्थिनीने यापुर्वी विद्यापीठ / राज्य / राष्ट्रीय स्तरावरील साहस कार्यशाळेत सहभाग घेतलेला नसावा.

कृपया निकषानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत नि:शुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्या-जाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

**कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**

* साहस कार्यशाळा उद्घाटन सोहळा दि. ३० जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. **त्याकरीता विद्यार्थ्यांनी सकाळी १०.०० वाजेपर्यंत चोपडा बस स्टॅंड येथे उपस्थित रहावे.**
* **चोपडा ते कर्जाने** जाण्यासाठी पुढील वेळेत बसेस उपलब्ध आहेत. सकाळी ७.००, ०८.००, १०.३० (विशेष बस सकाळी १०.०० वाजता.)
* कार्यशाळा कालावधी २ दिवसांचा असल्याने विद्यार्थ्यांनी गरजेनुसार आवश्यक साहित्य, पाणी बॉटल, पांघरुण, गरम कपडे, बॅटरी, कापडी बुट-मोजे तसेच गरजेनुसार आवश्यक औषधी सोबत आणावी. कृपया विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू / मोबाईल वा गरजेपेक्षा अधिक रक्कम सोबत आणू नये.
* कार्यशाळेला केवळ ०३ विद्यार्थी व ०३ विद्यार्थिनी यांचीच निवड करून त्यांना पाठवावे. निर्धारीत संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. कार्यशाळेत ०३ विद्यार्थी व ०३ विद्यार्थिनी येणे आवश्यक आहे. जर विद्यार्थिनी ऐवजी ०६ विद्यार्थी पाठविलेत तर त्यांचा प्रवेश नाकारला जाईल (फक्त मुलींचे महाविद्यालय / परिसंस्था वगळून) याची कृपया नोंद घ्यावी.

* कार्यशाळेत विद्यार्थ्यांची गटवार विभागणी करण्यात येत असल्याने त्यांना मिळालेल्या गटातच प्रशिक्षण व कला सादर करणे बंधनकारक राहिल.
* निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा/ही महाविद्यालयातील नियमित प्रवेशित असावा/ असावी व त्याच्या/ तिच्या कडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृपया स्पर्धेसाठी पाठवू नये.
* साहस कार्यशाळेमध्ये सायंकाळी विद्यार्थ्यांना पारंपारीक कला सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा, वाद्ये व आवश्यक साहित्य सोबत आणावे.
* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण, अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**
  १. मा. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर आ.सुर्यवंशी, भ्रमणध्वनी क्र. ९४२२७९३२८०,
  ई-मेल - mgtsm_asc@yahoo.com
  २. प्रा.डॉ.दत्तात्रय दे.कर्दपवार, विद्यार्थी विकास अधिकारी. भ्रमणध्वनी क्र.९४२११८५१९४१
  ३. डॉ. प्रीती रावतोळे,महिला विद्यार्थी विकास अधिकारी. भ्रमणध्वनी क्र.९८६०१८४०५८

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुन:श्च कळविण्यात येते की, **जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळे साठी** निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि. २८ जानेवारी २०२५** पर्यंत **मा. प्राचार्य, दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा. जि. जळगाव** यांना ईमेल mgtsm_asc@yahoo.com व्दारे पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वयंवृत्त विद्यापीठ **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर भेट दिल्यास उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
17-1-25
(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

* सोबत :- विद्यार्थी स्वयंवृत्त

* प्रत माहितीसाठी :-

१. प्राचार्य, दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा. जि. जळगाव
२. डॉ.संजय काशिनाथ पाटील, जळगाव जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक, पंकज महाविद्यालय, चोपडा, जि.जळगाव
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
४. मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
५. मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
६. मा.जनसंपर्क अधिकारी, कृपया सदरची बातमी प्रसिध्दी बाबत कार्यवाही करावी.

Z:\\xpdata/mpp24-25/adventureworkshop

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

# विद्यार्थी स्वयंवृत्त
# जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळा

1) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- ------------------------------------------------------------

2) वर्ग :- -------------

3) जन्म तारीख :- / /

4) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही

5) रक्त गट :- ------

6) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

7) भ्रमणध्वनी क्र. :- ( )

8) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळाचे नाव :- --------------------------------------------------

9) ओळखपत्र क्र. :- -----------------

10) विद्यार्थी विकास उपक्रम सहभाग :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

11) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

विद्यार्थी / विद्यार्थीनीची सही व नाव

--------------------------------------------------------------------------------

## -: पालकाचे संमती पत्र :-

संमती पत्र लिहून देतो/देते की, श्री/सौ./ ------------------------------------------ माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे ---------------------------------------- हा/ही सदर कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहानी दावा करणार नाही.

पालक/वडील/आई यांचे नाव व स्वाक्षरी

--------------------------------------------------------------------------------

## -: महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा यांचे शिफारस पत्र :-

विद्यार्थी नाव ------------------------------- हा/ही नियमित शिक्षण घेत असून नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. जळगाव जिल्हास्तरीय साहस कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /202

विद्यार्थी विकास अधिकारी
नाव व सही

प्राचार्य/संचालक
सही व शिक्का